शनिवार, १७ जानेवारी २०१५

सकाळ सातारा TODAY

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# आदिवासींच्या विकासासाठी जीवन अर्पण

## डॉ. रवींद्र कोल्हे; कोरेगावमध्ये डी. पी. भोसले कॉलेजमध्ये अनुभवकथन

**पळशी, ता. १६ :** आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या सोडवताना त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांचे भविष्य उज्ज्वल करता येते, याच भावनेतून मेळघाटातील आदिवासींचा सर्वांगीण विकास आणि लोककल्याणासाठी मी माझे जीवन अर्पण केले आहे, असे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांनी नमूद केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये झालेल्या 'मेळघाटातील मोहोर' या कार्यक्रमात अनुभवकथन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सावंत होते. डॉ. कोल्हे म्हणाले, ''शिक्षकाने विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक जडणघडणविषयक मौल्यवान संस्कार द्यावेत. दुसऱ्यांना मदत करणे, हाच खरा मानवता धर्म आहे. आदिवासी भागामध्ये श्रमदानातून संस्कार होतात. त्यामुळे त्या ठिकाणी पैशांपेक्षा हाताच्या कामाला अधिक महत्त्व आहे.''



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये 'मेळघाटातील मोहोर' या कार्यक्रमात अनुभवकथन करताना डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. स्मिता कोल्हे.**

डॉ. स्मिता कोल्हे म्हणाल्या, ''आदिवासी महिला कणखर आणि निर्भय आहेत. अशाच महिला जग बदलू शकतात. महिलांनी लाचारी स्वीकारण्यापेक्षा स्वाभिमान जिवंत ठेवून आदिवासींच्या उन्नतीसाठी माणुसकीचं जिणं उपयोगात आणावे.'' यावेळी अलगूज ग्रुपचे कार्यकर्ते डॉ. मिलिंद शहा यांचेही भाषण झाले. प्राचार्य डॉ. सावंत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या खाऊच्या खर्चातून तसेच सेवकांकडून जमा झालेली दहा हजार १११ रुपयांची देणगी डॉ. कोल्हे दांपत्याच्या कार्याला मदत म्हणून देण्यात आली. प्रा. पद्मिनी मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. बी. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय गाताडे, अधीक्षक मारुती पवार, अलगूज ग्रुपचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.